निलंबन भत्त्याचे पुनर्विलोकन करणेबाबत
श्री.उध्दव कोंडीराम मरकड, सेवा निलंबित
प्रा.शि.,जि.प.प्रा.शा.कडगांव,ता.पाथर्डी

जिल्हा परिषद अहमदनगर
शिक्षण विभाग (प्राथमिक)
जावक क्रमांक कार्या2/खाचौ/1286/2018
दिनांक - 15 / 12 /2018

संदर्भ - 1. या कार्यालयाकडील निलंबन आदेश क्रमांक
जा.क्र.कार्या1/पीबीएस/233/2018,दिनांक 14/05/2018
2. या कार्यालयाकडील दोषारोप ज्ञापन क्रमांक क्रमांक कार्या2/खातेचौकशी /980/2018, दिनांक 20/08/2018
3. या कार्यालयाकडील विभागीय चौकशी अधिकारी नियुक्ती आदेश क्रमांक कार्या2/खातेचौकशी/1189/2018, दिनांक 30/10/2018
4. महाराष्ट्र नागरी सेवा पदग्रहण अवधी,स्वीयेत्तर सेवा आणि निलंबन, बडतर्फ व सेवेतुन काढून टाकणे या काळातकील प्रदाने नियम 1981 चे नियम 68(1) चे नियम 68(1) (ए) (1)
5. महाराष्ट्र शासन वित्त विभागाकडील शासन निर्णय क्र.ओआरएस-1081/सीआर/877 एसईआर-8/,दनांक 10 डिसेंबर 1981

श्री.उध्दव कोंडीराम मरकड, सेवा निलंबित प्राथमिक शिक्षक, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा कडगांव, ता.पाथर्डी, जिल्हा - अहमदनगर यांना संदर्भ क्रमांक 1 अन्वये जिल्हा परिषद सेवेतुन निलंबित केलेले आहे. श्री.उध्दव कोंडीराम मरकड, सेवा निलंबित प्राथमिक शिक्षक, यांना सेवा निलंबन कालावधीत आजपावेतो 50 टक्के या प्रमाणे निर्वाह भत्ता अदा करण्यांत आलेला आहे. श्री. मरकड यांचे जिल्हा परिषद सेवेतील निलंबन काळातील मुख्यालय पंचायत समिती नेवासा आहे.

श्री.उध्दव कोंडीराम मरकड, सेवा निलंबित प्राथमिक शिक्षक, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा कडगांव, ता.पाथर्डी, यांचे गैरवर्तनाबाबत 1 ते 4 दोषारोप ज्ञापन संदर्भ क्रमांक 2 अन्वये श्री.मरकड यांना बजाविणेत आलेले आहे. तसेच संदर्भ क्रमांक 3 अन्वये दोषारोप ज्ञापनातील दोषारोपांची विभागीय चौकशी करणेसाठी विभागीय चौकशी अधिकारी यांची नियुक्ती करणेत आलेली आहे.

श्री.उध्दव कोंडीराम मरकड, सेवा निलंबित प्राथमिक शिक्षक, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा कडगांव, ता.पाथर्डी, यांचे निलंबन कालावधीस दिनांक 14/05/2018 ते आजपर्यंत 5 महिन्यापेक्षा जास्त कालावधी झालेला आहे.

महाराष्ट्र नागरी सेवा (पदग्रहण अवधी, स्वीयेत्तर सेवा आणि निलंबन, बडतर्फी व सेवेतुन काढून टाकणे या काळातील प्रदाने) नियम 1981 चे नियम 68 (1) (ए) (1) नुसार श्री.उध्दव कोंडीराम मरकड, सेवा निलंबित प्राथमिक शिक्षक, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा कडगांव, ता.पाथर्डी, यांना सध्या मिळत असलेल्या निर्वाह भत्त्यांत 50 टक्के वाढ करणेत येत असून त्यांना ( 50 % +25 % = 75 % ) निलंबित केले पासून तीन महिन्यानंतर वाढविणे बाबत या आदेशान्वये मंजुरी देण्यांत येत आहे.

श्री.उध्दव कोंडीराम मरकड, सेवा निलंबित प्राथमिक शिक्षक, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा कडगांव, ता.पाथर्डी, यांना संदर्भ क्रं. 1 नुसार देण्यांत आलेल्या आदेशामधील अटी व शर्तीचे काटेकोरपणे पालन करणे त्यांच्यांवर बंधनकारक आहे.

सदर आदेश अहमदनगर जिल्हा परिषदेच्या www.nagarzp.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यांत आला असून त्याचा संकेतांक 201812151604403 असा आहे.

15/12/18

(विश्वजीत माने)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहमदनगर

प्रति,

श्री.उध्दव कोंडींराम मरकड, सेवा निलंबित प्राथमिक शिक्षक
जि.प.प्रा.शा.कडगांव,ता.नेवासा, जिल्हा अहमदनगर
द्वारा व प्रत - गट शिक्षणाधिकारी पंचायत समिती पाथर्डी
2/- सदर आदेशाची प्रत संबंधितांस बजावण्यांत येऊन सोबत जोडलेल्या दुय्यम प्रतीवर आदेश बजाविले बाबतची त्यांची दिनांकित स्वाक्षरी घेऊन पोहोच या कार्यालयांस सादर करावी.

प्रत - गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती नेवासा यांना माहितीसाठी

15/12/18

(विश्वजीत माने)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहमदनगर